# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

**शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना कॅरिऑन अंतर्गत शैक्षणिक सत्र पूर्ण करणेबाबत तात्पुरता प्रवेश व परीक्षा देणेबाबत.**

## कॅरिऑनबाबत सुधारित परिपत्रक

**(परिपत्रक क्र. अभ्यासक्रम विभाग/अभियांत्रिकी/कॅरिऑन/३१/२०१७/४९७२-५००१ दिनांक २८.८.२०१७ मध्ये दुरुस्तीबाबत)**

या परिपत्रकान्वये अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सर्व संबंधित प्राचार्य, विद्यार्थी इत्यादिंना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये काही महाविद्यालये डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे यांच्याशी प्रथम वर्षासाठी संलग्नित झालेले असल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये पुढील शिक्षणासाठी संभ्रमावस्था निर्माण झालेली होती. त्याबाबत विविध विद्यार्थी संघटनाचे कॅरिऑनबाबत निवेदने व मागणी होती, त्यानुषंगाने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेता कॅरिऑन अंतर्गत शैक्षणिक सत्र पूर्ण करण्यासाठी मा. कुलगुरू महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ पोटकलम (७) व (८) अन्वये त्यांना असलेल्या विशेषाधिकारात तथा अधिष्ठाता मंडळ, विद्या परिषद आणि व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता प्रदान केली आहे. त्यानुषंगाने कॅरिऑन अंतर्गत प्रवेश व परीक्षा देणेबाबतची नियमावली खालीलप्रमाणे राहील.

१. अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या सर्वच अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रथम वर्षामधून द्वितीय वर्षात, द्वितीय वर्षामधून तृतीय वर्षात आणि तृतीय वर्षामधून अंतिम वर्षात अनुक्रमे कॅरिऑन अंतर्गत तात्पुरता प्रवेश घेण्यास पात्र समजण्यात येऊन त्यांच्या लेखी/प्रात्यक्षिक परीक्षा तसेच अंतर्गत टेस्ट/टर्म वर्क पूर्ण करण्यासही पात्र समजण्यात येईल. मात्र, या विद्यार्थ्यांनी लगतच्या पुढील वर्गामध्ये प्रवेश घेण्यापूर्वी मागील वर्गातील टर्म (अनुत्तीर्ण वर्ग) (सत्र) समाधानकारकपणे पूर्ण केलेली असणे आवश्यकच आहे. जसे :

- (उदा : प्रथम वर्षामध्ये अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना द्वितीय वर्षामध्ये तात्पुरता प्रवेश देण्यात येईल व त्यांची द्वितीय वर्षाची लेखी व प्रात्यक्षिक, Class Test, Term Work इत्यादी परीक्षा घेण्यात येईल.
- द्वितीय वर्षाच्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना तृतीय वर्षामध्ये तात्पुरता प्रवेश देण्यात येईल व त्यांची तृतीय वर्षाची लेखी व प्रात्यक्षिक Term Work, Class Test इत्यादी परीक्षा घेण्यात येईल.
- तृतीय वर्षात अनुत्तीर्ण आहेत अशा विद्यार्थ्यांना अंतिम वर्षात (B.E. Final) प्रवेश देण्यात येईल व Term Work तसेच Class Test लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा देखील घेण्यात येतील.

..२.

**प्रथम ते अंतीम वर्षास कॅरिऑन अंतर्गत परीक्षा देणेसंबंधीचा तपशिल दर्शविणारा तक्ता-१**

**उदा :**

| Sr. No. | Course / Class | Carry on Class | | Eligible to appear for Examination under Carry on | Remark |
|---|---|---|---|---|---|
| | | From | To | | |
| 1. | F.E.<br>(All backlong students) | F.E. | S.E. | Class Test, Term Work, Theory, Pract. Etc. | **As shown in the table, all students allowed carry and they can appeared for all type of examinations (Nov-Dec-2017 & onwards)** |
| 2. | S.E.<br>(All backlog students) | S.E. | T.E. | Class Test, Term Work, Theory, Pract. Etc. | |
| 3. | T.E.<br>(All backlong students) | T.E. | B.E. | Class Test, Term Work, Theory, Pract. Etc. | |

२. जे विद्यार्थी प्रथम वर्षामध्ये ए.टी.के.टी. अंतर्गत द्वितीय वर्षामध्ये शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये अथवा त्यापूर्वी टर्म पूर्ण केलेले आहेत आणि शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये द्वितीय वर्षात ए.टी.के.टी. तथा उत्तीर्ण आहेत, परंतु प्रथम वर्षामध्ये अनुत्तीर्ण आहेत, अशा विद्यार्थ्यांना तृतीय वर्षामध्ये महाविद्यालयांनी केवळ तात्पुरता प्रवेश देऊन त्यांचे अंतर्गत Class Test/Term Work पूर्ण करुन घेण्यात यावे, मात्र अशा विद्यार्थ्यांना तृतीय वर्षाच्या प्रथम सत्रामध्ये लेखी/प्रात्यक्षिक परीक्षेचे आवेदनपत्र भरता येणार नाही व परीक्षाही देता येणार नाही. हे विद्यार्थी प्रचलित नियमाप्रमाणे पात्र झाल्यावरच द्वितीय सत्राची (एप्रिल/मे २०१८) अथवा त्यापुढील परीक्षा म्हणजे तृतीय वर्षाच्या दोन्ही सत्राची (प्रथम व द्वितीय सत्र) परीक्षा देऊ शकतील. याचप्रमाणे द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनाही अंतीम वर्षासाठी हा नियम लागू राहील. ,

**प्रथम ते अंतीम वर्षास कॅरिऑन अंतर्गत टर्म पूर्ण करणेबाबत तपशिल दर्शविणारा तक्ता-२**

**उदा :**

| Sr. No. | Course / Class | Carry on Class | | Eligible to appear for Examination under Carry on | Remark |
|---|---|---|---|---|---|
| | | From | To | | |
| 1. | F.E. = F. ATKT. but<br>S.E. F. ATKT **or** Pass | S.E. | T.E. | Only appeared for Class Test, Term Work | **As shown in the table, Carry on facility allowed only for Class Test, Term Work or Only for Term completion. They can not appeared for Theory/ Practical examination for Nov-Dec 2017 exams.** |
| 2. | S.E. F. ATKT<br>F.E. pass in all subjects **but**<br>T.E. F.ATKT **or** clear Pass | T.E. | B.E. | Only appeared for Class Test, Term Work | |

- **सदरील परिपत्रक बी.टेक. अभ्यासक्रमासाठीही लागू राहील.**

३. कॅरिऑन अंतर्गत पुढील वर्गामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षेच्या संदर्भातील सर्व प्रचलित नियमांची पूर्तता केल्यानंतरच परीक्षा देता येईल.

४. कॅरिऑन अंतर्गत प्रवेश तथा परीक्षाबाबतची कार्यवाही पूर्ण करण्याचा अंतिम दिनांक २५.११.२०१७ पर्यंत असेल संबंधित विद्यार्थ्यांची वर्गनिहाय अभ्यासक्रमनिहाय यादी विद्यापीठाकडे (परीक्षा विभागास) दिनांक २७.११.२०१७ पर्यंत कार्यालयीन वेळेत जमा करावी. त्यानंतर प्रवेश तथा परीक्षांचे आवेदनपत्र कोणत्याही सबबीवर स्वीकारले जाणार नाहीत, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

...३.

५. कॅरिऑन अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांचे टेस्ट/टर्म वर्क दिनांक २८.११.२०१७ पर्यंत घेण्यात यावे. या कालावधीमध्ये प्रशासकीय अथवा तांत्रिक बाबींमुळे शक्य होत नसेल तर लेखी परीक्षेचा अंतिम पेपर संपल्यापासून २० दिवसांचे आत टेस्ट/टर्म वर्क घेण्यात यावे आणि २१ व्या दिवशी (दुसऱ्या दिवशी) विद्यापीठामध्ये गुण सादर करण्यात यावे. अ.क्र. ०२ (तक्ता क्र. २) मधील विद्यार्थ्यांच्याबाबत महाविद्यालयाकडेच गुणयादी ठेवण्यात यावी, याची नोंद घ्यावी.

६. जे विद्यार्थी detained झालेले आहेत, त्या विद्यार्थ्यांना कॅरिऑन अंतर्गत पुढील वर्गामध्ये प्रवेश तथा परीक्षा देता येणार नाही.

७. कॅरिऑन अंतर्गत विद्यार्थ्यांच्या संदर्भात समाज कल्याण विभागाकडून अथवा इतर विभागाकडून मिळणाऱ्या शिष्यवृत्ती / फेलोशिप इत्यादी बाबतच्या सवलतीस विद्यापीठ व महाविद्यालय जबाबदारी राहणार नाही, याबाबतची सर्वस्वी जबाबादारी व्यक्तीशः विद्यार्थ्यांची राहील, असे हमीपत्र विद्यार्थ्यांकडून घेण्यात यावे.

८. कॅरिऑन अंतर्गत प्रवेश / परीक्षा घेणे / देणे हा सर्वस्वी विद्यार्थ्यांचा अधिकार असेल. महाविद्यालयांनी सक्ती करु नये. एखाद्या विद्यार्थ्याची कॅरिऑन घेण्याची इच्छा नसेल तर तो पुढील शैक्षणिक वर्षात पात्र झाल्यावर प्रवेश घेऊ शकतो.

९. कॅरिऑन अंतर्गत एखाद्या विद्यार्थ्यांना लेखी / प्रात्यक्षिक परीक्षा देण्याची इच्छा नसेल, परंतु अंतर्गत टेस्ट / टर्मवर्क पूर्ण करण्यास तयार असल्यास, त्यांना ते करता येईल.

१०. यापूर्वीचे कॅरिऑन संदर्भातील दिनांक १९.०८.२०१७ दिनांक २४.०८.२०१७ आणि दिनांक २८.०८.२०१७, रोजी निर्गमित करण्यात आलेले परिपत्रक निरसित (रद्द) समजण्यात यावेत.

११. कॅरिऑन अंतर्गत परीक्षेस बसण्यास अनुमती दिलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा नियमित विद्यार्थ्यांसोबत होत असल्यामुळे सर्व प्रक्रिया करुन घेण्यासाठी दिनांक ०७.१२.२०१७ पर्यंतचा अवधी असल्यामुळे कोणत्याही विद्यार्थ्यांची अडवणूक महाविद्यालयाकडून होऊ नये.

उपरोक्त प्रमाणे अ.क्र. १ ते ११ बाबतची नोंद प्राचार्य, विद्यार्थी व सर्व संबंधितांनी घेऊन परिपत्रकामधील नियमावलीचे पालन करण्यात येऊन योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

विद्यापीठ परिसर ][
औरंगाबाद-४३१००४ ][

संदर्भ क्र. शैक्षणिक/अ.वि./२०१७-१८/17230 ][

दिनांक : १८.११.२०१७ ][

विशेष कार्यासन अधिकारी
(शैक्षणिक, नियोजन व सांख्यिकी,
पदव्युत्तर, पीजी पीएच.डी, आरक्षण)

या परिपत्रकाची प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव :

१. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित अभियांत्रिकी महाविद्यालये, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव देण्यात येत आहे.
२. मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
३. मा. कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
४. उपकुलसचिव, पदव्युत्तर विभाग, परीक्षा विभाग व पात्रता विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
५. व्यवस्थापकीय संचालक, एम.के.सी.एल. पुणे
६. संचालक, युनिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
७. समन्वयक (ई-सुविधा केंद्र), एम.के.सी.एल. औरंगाबाद